सभासद ईजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून (परोक्ष ई-मतदान) आपली मते देऊ शकतील. परोक्ष ई-मतदानाचा कालावधी बुधवार, दि. २४.११.२०२१ रोजी स. ९.०० वा. (भा. प्र. वे.) सुरू होईल व शुक्रवार, दि. २६.११.२०२१ रोजी सायं. ५.०० वाजता (भा. प्र. वे.) संपेल. सदर कालावधीदरम्यान, **शनिवार, दि. २०.११.२०२१** (''निर्धारित अंतिम तारीख'') रोजीनुसार कागदोपत्री स्वरूपातील किंवा डीमटेरियलाइज्ड् स्वरूपातील भागधारक असलेले सभासद परोक्ष ई-मतदानाद्वारे आपली मते देऊ शकतील.

परोक्ष ई-मतदानाकरिताचे विस्तृत निर्देश ईजीएमच्या सूचनेत दिलेले आहेत. सभासदांनी कृपया खालील बाबींची नोंद घ्यावी :

ए) परोक्ष ई-मतदान कालावधी खालील कालावधीदरम्यान उपलब्ध असेल :

परोक्ष ई-मतदानाचा प्रारंभ	बुधवार, दि. २४.११.२०२१ रोजी स. ९.०० वाजल्यापासून
परोक्ष ई-मतदान समाप्ती	शुक्रवार, दि. २६.११.२०२१ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत.

तत्पश्चात सीडीएसएलद्वारे परोक्ष ई-मतदानाची सुविधा अकार्यरत करण्यात येईल.

बी) सभासदांचा मतदान हक्क हा **शनिवार, दि. २०.११.२०२१** (''निर्धारित अंतिम तारीख'') रोजीनुसार कंपनीच्या प्रदानित समभाग भांडवलातील त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणात असेल. परोक्ष ई-मतदान प्रणालीची सुविधा सभेदरम्यानही उपलब्ध असेल व परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत यापूर्वी न दिलेले सभेस उपस्थित राहिलेले सभासद सभेदरम्यान आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील. निर्धारित अंतिम तारखेनुसार सभासदांचे रजिस्टर/लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नाव नोंद असलेल्या व्यक्तीच केवळ एजीएमपूर्वी परोक्ष ई-मतदान व ईजीएमदरम्यान मतदानाची सुविधा प्राप्त करू शकतील.

सी) एखाद्या सभासदाने सूचनेच्या ई-मेल/पाठवणीपश्चात कंपनीचे शेअर्स संपादित केले असतील व कंपनीचा सभासद बनला असल्यास व निर्धारित अंतिम तारखेस भागधारक असल्यास सदर व्यक्ती helpdesk.evoting@cdslindia.com येथे ई-मेल पाठवून परोक्ष ई-मतदानाकरिता लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल किंवा सीडीएसएलद्वारे दिलेल्या टोल फ्री क्रमांक १८००-२२५५३३ वर संपर्क साधू शकेल. निर्धारित अंतिम तारखेस सभासद नसलेल्या व्यक्तींनी सदर सूचना केवळ माहितीसाठी समजावी.

५. कागदोपत्री स्वरूपातील/डीमॅट स्वरूपातील भागधारक असलेल्या व कंपनी/रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट्स (रजिस्ट्रार)/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपीज) यांच्याकडे ई-मेल पत्ते न नोंदवलेले/अद्ययावत न केलेल्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत/अद्ययावत करण्यासाठी तसेच परोक्ष ई-मतदानाद्वारे वा ईजीएममध्ये ई-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठी युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करण्यासाठी कृपया खालील दस्तावेज /माहिती ई-मेलद्वारे investor@tilind.com येथे वा info@bigshareonline.com येथे पाठवावी.

- कंपनीच्या नोंदींमध्ये नोंदणीकृत नाव.
- ई-मेल आयडी व मोबाइल क्रमांक.
- डीपीआयडी - क्लायन्ट आयडी, क्लायन्ट मास्टर कॉपी वा कन्सॉलिडेटेड अकाऊंट स्टेटमेंट (डीमॅट स्वरूपात धारण शेअर्ससंदर्भात)
- शेअर प्रमाणपत्राची पुढील व मागील बाजूची स्कॅन केलेली प्रत (कागदोपत्री स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससंदर्भात).
- पॅन व आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत.

६. एखाद्या व्यक्तीने सूचनेच्या पाठवणीपश्चात कंपनीचे शेअर्स संपादित केले असतील व कंपनीचा सभासद बनला असल्यास व निर्धारित अंतिम तारखेस भागधारक असल्यास सदर व्यक्ती ईजीएमच्या सूचनेमध्ये विहित केल्यानुसार लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतील.

७. इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मतदान सुविधेशी संबंधित सर्व तक्रारी श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल), ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युच्युरेक्स, मफतलाल मिल कम्पाऊंड्स, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०० ०१३ येथे पाठवाव्यात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ई-मेल करावा किंवा ०२२-२३०५८५४२/४३ येथे संपर्क साधावा.

८. परीनिरीक्षकांच्या अहवालासमवेत घोषित निकाल अध्यक्षांद्वारे वा त्यांच्याद्वारे लिखित स्वरूपात अधिकृत व्यक्तीद्वारे निकालाच्या घोषणेपश्चात त्वरित कंपनीची वेबसाइट www.tilind.com वर तसेच सीडीएसएलच्या वेबसाइटवर प्रदर्शित करण्यात येईल. निकाल स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइट्स अर्थात www.bseindia.com व www.nseindia.com वरही अपलोड करण्यात येईल.

संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने
सही/-
अमित डहाणूकर
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : ०३.११.२०२१
ठिकाण : मुंबई

जाहिरात

में. हॉटेल धनराज, एफएल-३/८, ही अनुज्ञप्ती लिंकिंग रोड, ब्रांद्रा (प) मुंबई येथे कार्यरत असून मे. हॉटेल धनराज एफएल-३/८, लिंकींग रोड, बांद्रा (प) मुंबई ही अनुज्ञप्ती श्री अजय शहा व श्रीमती धनवंती शिवचरण शहा यांचे नावे कार्यरत आहे. मात्र श्री अजय शहा यांनी त्यांचे जास्तीच्या वयोमानामुळे /प्रकृती अस्वास्थामुळे त्यांचे नाव कमी करण्याची विनंती केली आहे. तसेच अनुज्ञप्तीचे दुसरे भागीदार श्रीमती धनवंती शिवचरण शहा यांचे निधन झाल्यामुळे त्यांचेही नाव कमी करून सदर अनुज्ञप्तीमध्ये श्री विशेष अनिल शहा व श्रीमती प्रभा अनिल शहा यांचे नाव समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. तरी सदर प्रकरणी कोणाची काहीही हरकत असल्यास सदरील जाहिर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसांच्या आत मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगरे, जुने जकात घर, तळ मजला शहीद भगतसिंग मार्ग मुंबई-२३ यांच्याशी संपर्क साधावा. प्रस्तुत प्रकरणी जर वरील मुदतीत याबाबत कोणाचा लेखी आक्षेप आला नाही तर सदर अनुज्ञप्तीमधून श्री. अजय शहा व दिवंगत भागीदार श्रीमती धनवंती शिवचरण शहा यांचे नाव कमी करून सदर अनुज्ञप्तीमध्ये श्री विशेष अनिल शहा व दिवंगत भागीदार श्रीमती धनवंती शिवचरण शहा यांचे नाव कमी करून सदर अनुज्ञप्तीमध्ये श्री. विशेष अनिल शहा व श्रीमती प्रभा अनिल शहा यांचे नाव समाविष्ट करण्यात येईल याची संबंधितांना नोंद घ्यावी.

सही/-
अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
मुंबई, उपनगरे.

रोज वाचा दै. 'मुंबई लक्षदीप'

दी बॉम्बे ऑईल प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: ४था मजला, ग्रॅण्ड पॅलेडीयम, १७५, सीटीएस रोड, कलिना, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई-४०००९८
सीआयएन: यु१५१००एमएच१९४८पीटीसी००६१७९
ई-मेल:chaitanya.deshpande@sharrpventures.com

संयुक्त जाहीर सूचना

दी बॉम्बे ऑईल प्रायव्हेट लिमिटेड (कंपनी) आणि श्रीमती अर्चना मारीवाला, श्री. हर्ष मारीवाला यांची पत्नी व कुमारी राजवी मारीवाला, श्री. हर्ष मारीवाला यांची मुलगी (प्राप्तकर्त्या) यांच्याद्वारे भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा वेळोवेळी वितरीत संदर्भ क्र.००७/०३.१०.११९/२०१६-१७ धारक मास्टर डायरेक्शन-नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी-नॉन-सिस्टॅमेटीकली इम्पोर्टंट नॉन-डिपॉझिट टेकींग कंपनी (रिझर्व्ह बँक) डायरेक्शन्स, २०१६ चे परिच्छेद ६४ नुसार संयुक्तपणे सदर जाहीर सूचना देण्यात येत आहे.

सदर कंपनी ही कंपनी कायदा १९१३ अंतर्गत स्थापन आहे आणि एक नॉन-डिपॉझिट घेणारी नॉन-बँकिंग फायनान्स कंपनी म्हणून नोंदणी प्रमाणपत्र क्र.एन-१३.०२०४० नुसार नोंदणीकृत आहे. टॉरस फॅमिली ट्रस्ट, व्हॅलेन्टाईन फॅमिली ट्रस्ट, जेमिनी फॅमिली ट्रस्ट व ॲक्वारियस फॅमिली ट्रस्ट (फॅमिली ट्रस्टस्) हे फॅमिली ट्रस्टचे लाभार्थी असलेल्या कुमारी राजवी मारीवाला यांना ०.०१% असणारे एक शेअर आणि श्रीमती अर्चना मारीवाला यांना कंपनीचे भरणा केलेले भांडवलाचे ९९.९९% असणारे १७,९९९ शेअर्स वितरण करू इच्छित आहेत. कंपनीने यापुर्वीच पत्र क्र.१३-२०-१११/२०२१-२२ नुसार आरबीआय, मुंबईकडून मालकीत्व व नियंत्रणाचे बदलाकरिता पुर्व परवानगी घेतली आहे.

यासंदर्भात काही स्पष्टीकरण आणि/किंवा हरकती असल्यास सदर सूचना तारखेपासून ३० दिवसांच्या आत कंपनीकडे श्री. चैतन्य देशपांडे यांना कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा chaitanya.deshpande@sharrpventures.com ई-मेल पाठवावेत.

दी बॉम्बे ऑईल प्रायव्हेट लिमिटेडकरिता
सही/-
रिषभ हर्ष मारीवाला
संचालक
प्राप्तकर्त्यांकरिता

ठिकाण: मुंबई **सही/-** **सही/-**
दिनांक: **अर्चना मारीवाला** **राजवी मारीवाला**

---

modella

मॉडेल्ला वूलन्स लिमिटेड

सीआयएन:एल१७१२०एमएच१९६१पीएलसी०१२०८०
नोंदणीकृत कार्यालय: ४-सी, वल्कॅन इंश्युरन्स इमारत, वीर नरीमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२०. **दूर.:**०२२-२२७४७४२४,
ई-मेल: modellawooll

ऐन दिवाळीत रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात विक्रीसाठी जाताना पकडला

वाहनासह ९ लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त, दोघांविरुद्ध गुन्हा

अकोले, (वार्ताहर) : तालुक्यातील गोरगरीबांना देण्यात येणारे शासकीय गोदामातील रेशनिंगचे धान्य दोन अशासकीय व्यक्तीच्या खाजगी घरातून तालुक्यातील महसूल विभागाकडून ऐन दिवाळीत अवैध तांदूळ कट्टे व वाहनासह ९ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यापूर्वी चार महिन्यापूर्वी राजूर येथील पोलीस ठाण्यासमोरच वेगवेगळ्या तीन मालट्रकमधून सुमारे ५६ लाख रूपयांचा अकोल्यातील शासकीय गोदामातील रेशनिंगचे धान्य पोलीसांकडून पकडण्यात आल्यानंतर त्यावरदेखील तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्याची थातूरमातूर कारवाई करण्यात आली. यानंतर सोमवारी रात्रपाळीत पुन्हा महाराष्ट्र शासन असा स्पष्ट उल्लेख असलेली शासकीय रेशनिंगचे धान्याचे कट्टे छाप्यात सापडून आल्यानंतर तालुक्यातील राजकीय वर्तुळात या वृत्ताने एकच खळबळ उडवून दिली.

अकोले शहरापासून दोन किलोमीटर अंतरावरील नवलेवाडी येथील एका खाजगी घरातून व्यवसायिक विक्रीसाठी आणलेल्या ८२ गोण्या अवैध तांदळासह ९ लाख ८० हजार ७८ रुपयांचा मुद्देमाल महसूल व पोलीस प्रशासनाच्या कारवाईत मंगळवारी पहाटे ताब्यात घेण्यात आला. याबाबत अकोले पोलिस ठाण्यात सोमवारी रात्री उशिरापर्यंत चौकशी करून दत्ता सुदाम चोथवे व खंडू काशीनाथ भारमल (दोघेही राहणार राजूर) या आरोपींविरुद्ध मंगळवारी गुन्हा दाखल करण्यात आला. हा तांदूळ रेशनिंगचा असल्याचा आरोप-प्रत्यारोप होत असून तो चोरट्या बाजारात विकणाऱ्यासाठी नेण्यात येणार होता, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. यासंदर्भात प्रतिक्रीया देताना तहसीलदार सतीश थेटे यांनी सांगितले, रेशनिंगचा तांदूळ आमच्या शासकीय गोदामातून स्वस्त धान्य दुकानात व तेथून ग्राहकांच्या ताब्यात गेल्यानंतर त्याचे काय करायचे हे त्या ग्राहकांवर अवलंबून आहे. तो त्यांचा प्रश्न आहे. मात्र महाराष्ट्र शासन नावाने गोण्यात भरलेला अवैध तांदूळ आढळून आल्याने यावर कायदेशी कारवाई करण्यात येत आहे. तहसीलदार कार्यालयातील पुरवठा निरीक्षक सतीशकुमार थारव यांनी याबाबत अकोले पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. शासकीय गोदामपाल सचिन शिंदे यांचा फोन आल्यानंतर नवलेवाडी येथील रहीवासी प्रमोद भिकाजी नवले यांच्या मालकीच्या पत्र्याचे शेडमध्ये १ लाख १२ हजार रुपये किंमतीच्या प्रतिकिलो ५० भरलेली ७५ खाकी गोण्या तांदूळ आढळला व त्या गोण्यांवर महाराष्ट्र शासन असे स्पष्ट लिहिलेले दिसून आले. वाहन क्रमांक एमएच १७, बी व्ही ३५१८ मध्ये १०७ गोण्या नर्मदा पोल्ट्री फिड असे लिहिलेल्या १८२ गोण्यात अवैध तांदूळ आढळून आला. हे पत्र्याचे शेड भाडेतत्त्वावर घेण्यात आले होते, अशी चर्चा आहे.

अकोल्याचे भाजपचे नेते माजी आमदार वैभव पिचड यांच्या कार्यकर्त्यांकडून हे रेशनिंगवरील तांदूळ चोरणारे रॅकेट उघडकीस आणल्याची चर्चा आहे. मंगळवारी दुपारनंतर वैभव पिचड यांनी तहसीलदार सतिश थेटे व सहाय्यक पोलिस निरीक्षक मिथुन घुगे यांना यासंदर्भातील निवेदन देऊन जप्त मुद्देमालाची पाहणी केली. याप्रसंगी त्यांच्यासोबत भाजपचे शंभू नेहे, बाळासाहेब वडजे, राजेंद्र देशमुख, राज गवांदे, परशराम शेळके, सचिन शेटे, राहुल देशमुख, अरुण शेळके, विजय पवार, नरेंद्र नवले, कैलास जाधव, किशोर काळे, प्रसन्न धोंगडे, शंकर घोलप, सौरभ देशमुख, गोकुळ वाघ, रोहिदास जाधव, नितीन गायकवाड उपस्थित होते.

बजरंगवाडी येथे शेतकरी मेळावा संपन्न

कर्जत, (वार्ताहर) : कर्जत तालुक्यातील बजरंगवाडी येथे कर्जत तालुका कृषी विभागाच्यावतीने शेतकऱ्यांसाठी मेळावा व शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बजरंगवाडी येथील सरपंच अंगद रुपनर, राहुल गोयकर, कृषी सहाय्यक शिवाजी शेळके यांच्यासह अनेक मान्यवर व शेतकरी उपस्थित होते.

यावेळी बोलताना कृषी सहाय्यक शिवाजी शेळके म्हणाले की, जिल्हा कृषी अधिकारी शिवाजी जगताप, उपविभागीय कृषी अधिकारी अनिल गवळी, तालुका कृषी अधिकारी पद्मनाभ म्हस्के, मंडल कृषी अधिकारी श्री भापकर, कृषी पर्यवेक्षक विठ्ठल शेळके, तसेच आमदार रोहित पवार व कृषी विज्ञान केंद्र बारामती यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभाग शेतकऱ्यांसाठी कर्जत तालुक्यात आणि कोरेगाव परिसरामध्ये सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे.

या अनुषंगाने बजरंगवाडी येथे शेतकऱ्यांसाठी मेळावा व शेतीशाळेचे आयोजन केले आहे. यामध्ये शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील ज्वारी पिकावर लष्करी आळी कामगंध सापळे, याचा प्रभावी वापर, ज्वारीच्या पिकांमधील पंचसूत्री कार्यक्रम याची सविस्तर माहिती देण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांची ज्वारीचे उत्पादनामध्ये मोठी वाढ होण्यासाठी त्यांना मदत होणार आहे, या प्रमाण हरभरा पिकाची बीजप्रक्रिया व इ पीक पाहणी महत्त्व शासनाचे धोरण व शेतकऱ्यांना मिळणारा फायदा याविषयी शिवाजी शेळके यांनी सविस्तर विवेचन केले. शेतकरीदेखील या वेळी त्यांना येणाऱ्या अडचणी समस्या याबाबत उपस्थित अधिकाऱ्यांना प्रश्न विचारले. गावचे सरपंच अगद रुपनर यांनी सर्व उपस्थित शेतकरी आणि कृषी विभागाचे अधिकारी यांचे आभार मानले.

संगमनेरमध्ये नाशिक-पुणे महामार्ग चौपदरीकरणाच्या भूमिपूजनासह विविध विकास कामांचे लोकार्पण

संगमनेर, (वार्ताहर) : महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली विकासातून वैभवाकडे वाटचाल करणाऱ्या संगमनेर शहरात नव्याने अमृतवाहिनी इंजिनीयरिंग कॉलेज ते बसस्थानक या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम होणार असून या कामाचे भूमिपूजन व शहरातील इतर विकास कामांचा लोकार्पण सोहळा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात व आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या उपस्थितीत शुक्रवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वा. संगमनेर बसस्थानक या ठिकाणी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती शहराच्या नगराध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना सौ. दुर्गाताई तांबे म्हणाल्या की महसूल मंत्री थोरात व आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहरात अनेक ऐतिहासिक कामे मार्गी लागली आहेत. नगरपालिका, कवी आनंद फंदी नाट्यगृह, पंचायत समिती, प्रांताधिकारी कार्यालय, क्रीडा स्टेडियम, पंचायत समिती कार्यालय, यांसह संगमनेर बायपास ,विविध पूल, विविध गार्डन, गंगामाई घाटाची सुशोभीकरण ,भूमिगत गटारे, निळवंडे धरणातून थेट पाईपलाईन योजना, याबरोबरच महाराष्ट्रातील सर्वात अद्ययावत असे हायटेक बसस्थानक उभे राहिले आहे.

संगमनेरमधील वाढते नागरिकीकरण व भविष्यातील गरजांचे नियोजन करून थोरात यांनी केंद्र व राज्य सरकारकडून पाठपुरावा करत संगमनेर बस स्थानक ते इंजीनियरिंग कॉलेज दरम्यानचा रस्ता चौपदरीकरण व सुशोभीकरणासाठी निधी मिळवला आहे. या अंतर्गत रस्त्यामध्ये डिव्हायडरसह विद्युतीकरण व वृक्षारोपण केले जाणार आहे. हा रस्ता संगमनेर शहराच्या वैभवात भर टाकणारा ठरणार असून या रस्त्याचे भूमिपूजन तसेच थोरात यांच्या स्थानिक विकास निधीतून व राज्य निधी अंतर्गत संगमनेर अकोले राज्य महामार्गावरील म्हाळुंगी पुलाचे सुशोभीकरण, कोल्हार घोटी राज्य महामार्ग रस्ता दुभाजक व विद्युत पथदिव्यांसह चौपदरीकरण अशा विविध विकास कामांचा समावेश आहे. यावेळी संगमनेर शहर व तालुक्यातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी या कार्यक्रमासाठी शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपनगराध्यक्ष इब्राहिम शेख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील, सौ सुनंदाताई दिघे, सौ वृषाली भडांगे, सौ. मालती डाके, मनीषा बळकट, सुहासिनी गुंजाळ, शबाना बेपारी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी राहुल वाघ, उपअभियंता सौरभ पाटील, सर्व नगरसेवक आणि नगरसेविका यांनी केले आहे.

कळसपिंपरी गावाच्या विकासासाठी नेहमीच प्रयत्नशिल : आ. मोनिका राजळे

पागोरी पिंपळगाव : पाथर्डी तालुक्यातील कळसपिंपरी गावामध्ये आमदार मोनिका राजळे यांच्या स्थानिक विकास निधितून व मा. सरपंच दिगुशेठ भवार यांच्या १५ व्या वित्त आयोगांर्तगत ८५ लक्ष रुपायाचा विविध विकास कामाचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी वैकुंठवासी वामनभाऊ महाराज गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथ गड यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. पाथर्डी तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असणारे कळसपिंपरी गाव नेहमी आप्पासाहेब(काका) राजळे व स्व.वा. राजाभाऊ राजळे यांचे प्रेमाचे गाव म्हणून ओळखले जानारे असून या गावावर विशेष असे प्रेम माझे पण नेहमी असेल व राजळे घराण्याचे हकाचे गाव म्हणून विकास कामात कधीही अंतर पडू देणार नाही.

भारतीय जनता पक्षाची सत्ता केंद्रामध्ये आहे. मोठ्या प्रमाणात निधी केंद्राकडून राज्यांना देण्यात येत आहे. राज्य सरकार हा निधी वाटपामध्ये भेदभाव करत आहे. मतदार संघामध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांकडे राज्य सरकारने दुर्लक्ष केले असून शेतकरी आणि त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले आहे. आगामी काळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये जनता त्यांना जागा दाखवेल, असे आमदार मोनिका ताई यानी आपल्या भाषणात बोलताना सांगितले. त्याच बरोबर गावातील हनुमान मंदिर सभामंडप, जि.शाळा खोली, कळसपिंपरी ते आखेगाव रस्ता व ग्रा.प.अंतर्गत असे एकूण ८५ लक्ष रु. विविध विकास कामाचा शुभारंभ करून त्वरित कामाना सुरुवात करण्याचे आदेश ठेकेदार यांना दिले.

यावेळी सरपंच सोसायटी अध्यक्ष व तालुक्यातील सर्व भा.ज.पा.चे कार्यकर्ते व गावकरी भजनी मंडळ यानी महंत विठ्ठल महाराज यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी कार्यक्रमास जि.प.सदस्य राहूल राजळे, भाजपा तालुकाध्यक्ष माणिक खेडकर, भाजपा महिला तालुकाध्यक्ष काशिताई गोल्हार, सभापती गोकुळ दौंड, प.स सदस्य सुनील ओहोळ, सुभाष केकाण आदी कोरडगाव गण व पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

आत्मदहनाचा इशारा

राहुरी, (वार्ताहर) : महात्मा फुले कृषी विद्यापीठ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे ९ नोव्हेंबर रोजी आपल्या न्याय हक्कासाठी मुंबई मंत्रालय येथे सामुदायिक आत्मदहन करणार असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले असून त्याबाबतचे पत्र मुख्यमंत्री यांनी पाठविण्यात आले आहे.

जोगेश्वरीच्या सभासदांना लाभांशाचे वाटप

राहुरी, (वार्ताहर) : सहकार क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या जोगेश्वरी आखाडा विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या सन २०-२१ या आर्थिक वर्षातील लाभांश वितरण अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण बाबुराव तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी माजी अध्यक्ष प्रल्हाद सांगळे होते.

अरुण तनपुरे म्हणाले की जिल्हा सहकारी बँकेने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवले असून त्यात प्रामुख्याने ३ लाख ऐवजी ५ लाख रुपयापर्यंत व्याज सवलत दिली आहे. ३ लाख रुपयापर्यंत केंद्र शासनाचे व्याज अनुदान व उर्वरित २ लाख रुपयासाठी जिल्हा सहकारी बँकेचे व्याज अनुदान आता दिले जात आहे याचा शेतकन्यांनी लाभ घ्यावा. त्याचप्रमाणे पशुपालनकर्जपुरवठ्यामध्ये मागील वर्षी ३ ते ४ महिनेच फक्त लाभधारकांना याचा उपयोग झाला परंतु मार्चअखेरीस इतर पतसंस्था व कर्ज काढून ते परत भरावे लागले कारण अनुदान त्या तारखेपर्यंत होते. परंतु आता वर्षाअखेरपर्यंत जिल्हा सहकारी बँकेमार्फत योजना राबविली असून सभासदांनी व लाभधारकांनी वेळेवर आपले कर्ज परत करावे जेणेकरून सहकारी संस्था उर्जितावस्थेत राहून लाभांश वाटप करता येतील असे तनपुरे यांनी आवर्जून सांगितले .

प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष संदीप भोंगळ यांनी यांनी करून सर्वांचे स्वागत केले. राहुरी नगरपालिकेचे नगरसेवक व संस्थेचे संचालक प्रकाश भुजाडी यांनी गेल्या चार वर्षांतील संस्थेचा हिशोब सविस्तरपणे सभासदांनी पुढे मांडला व यापुढील काळात लोकांच्या विश्वासात हे संचालक मंडळ निश्चित पात्र ठरेल असा विश्वास दिला. डॉ. तनपुरे कारखान्याचे व संस्थेचे संचालक विजय डौले यांनी संस्थेच्या सभासदांना यापुढील काळात दहा टक्क्यापर्यंत लाभांश देण्यासाठी पारदर्शक कारभार करून संस्थेच्या प्रगती पदाकडे लक्ष दिले जाईल असे सांगितले.

गेल्या काही दिवसात झालेल्या चुकीच्या कारभाराबद्दल खंत व्यक्त करत संस्थेचे सर्व विभाग पूर्ववत चालू करून संस्थेचे गतवैभव प्राप्त करू व अरुण तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली सर्व सहकाऱ्याच्या सहकार्याने संस्था पूर्वजांनी जे रोपटे लावले त्याचा वटवृक्ष की करू असा विश्वास दिला. अध्यक्षस्थानी माजी अध्यक्ष प्रल्हाद सांगळे पाटील होते.

पाथर्डी पोलीस स्टेशनतर्फे आरोपींना दिवाळी फराळ

पाथर्डी, (वार्ताहर) : समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या सणाचा आनंद घेता आला पाहिजे. त्यासाठी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी पोलिसांकडून आरोपीना देण्यात येणार फराळ व मिठाई वाटपाचा उपक्रम स्तुत्य आहे. जन्मात कोणतीही व्यक्ती गुन्हेगार नसतो चुकून न कळत त्याच्या हातातून गुन्हा घडतो. माणुसकीच्या नात्याने पोलिसांनी आरोपींना देण्यात आलेली मिठाई व फराळामुळे आरोपींची दिवाळी गोड होणार असून जेलमधून बाहेर आल्यानंतर व्यक्तींनी पुढील जीवन चांगल्या सामान्य नागरिकांप्रमाणे व्यतीत करून कायद्याचे पालन करावे, असे प्रतिपादन नगराध्यक्षा डॉ. मृत्युंजय गर्जे यांनी व्यक्त केले.

आढळा पतसंस्था निवडणूक चार जागा बिनविरोध; ११ जागांसाठी १३ जण रिंगणात

अकोले, (वार्ताहर) : तालुक्यातील देवठाण येथील आढळा ग्रामीण सहकारी बिगरशेती पतसंस्था निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरच्या दिवशी ११ जागांसाठी १३ अर्ज दाखल झाले. यामुळे निवडणूक रिंगणातील स्पर्धा भक्कम नसल्यानेच ही निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग सुकर असल्याचे दिसत आहे. संस्थेचे अध्यक्ष व अगस्ति साखर कारखान्याचे माजी संचालक अशोकबाबा शेळके यांना संचालक मंडळ निवडण्यासाठी काहींनी प्रत्यक्ष तर काहींनी अप्रत्यक्षपणे बिनविरोध संचालक मंडळ निवडण्यासाठीचा जाहीर पाठींबा दिला होता. थोडक्यात ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी शेळके यांनाच अधिकार दिले होते.

एकूण १५ पैकी ४ जागांवर फक्त ४ उमेदवारांचे अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातून बाबुराव नावजी पथवे व भटक्या २२२विमुक्त गटातून बाळासाहेब तुकाराम काकड आणा महिला राखीव दोन जागेवर लिलाबाई लहानू गायकवाड व मंगल शिवाजी सोनवणे बिनविरोध निवडणूक आले आहेत. अर्ज दाखल झाल्याने ते बिनविरोध निवडून आले. उर्वरीत ११ जागांवर १३ लोकांनी अर्ज दाखल केले असून यात बिनविरोध निवडून करण्यात कोण दोघंजण माघार घेतात ते पहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

निवडणूक अर्ज अशोक किसन सोनवणे, सावळेराम बाबुराव शेळके, पंढरीनाथ शिवराम शेळके, नारायण लक्ष्मण शेळके, बाळासाहेब लक्ष्मण बोडके, गोरक्षनाथ बाबुराव काळे, पंढरी विठोबा पवार यांनी दाखल केले आहेत. इतर मागासवर्गीय एका जागेसाठी अशोक किसन सोनवणे व दत्तात्रय केरु जोरवर या दोघांचे अर्ज आले. ही निवडणूक अशोकबाबा शेळके यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध व्हावी असा सर्वपक्षीय नेत्यांचा आग्रह आहे.

'अशोक'च्या निवडणुकीसाठी टाकळीभान गटाची यादी प्रसिध्द

टाकळीभान, (वार्ताहर) : अशोक सहकारी साखर कारखान्याची सन २०२१ ते २०२६ पंचवार्षिक निवडणूक लवकरच होणार असल्याने काल टाकळीभान गट मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

कारखाना निवडणूकीसाठी टाकळीभान, पढेगाव कारेगाव, वडाळा महादेव व उंदिरगाव असे ५ गट आहेत. टाकळीभान गटात ६ गावे असून एकूण २५९७ मतदार आहेत. पढेगाव गटात ११ गावे असून एकूण २२२१ मतदार आहेत. कारेगाव गटात ८ गावे असून एकूण २६६६ मतदार आहेत. वडाळा महादेव गटात ५ गावे असून एकूण २१८१ मतदार आहेत. उंदिरगाव गटात १३ गावे असून एकूण २०७१ मतदार असून एकूण ५ गटात ११७३६ मतदार आहेत.

टाकळीभान गटात टाकळीभान, भोकर, कमालपूर, घुमनदेव, घोगरगाव, बेलपिंपळगाव ही गावे असून टाकळीभान गटात एकूण २५९७ मतदार आहेत.

यावेळी अशोक कारखान्याचे माजी अध्यक्ष ज्ञानदेव साळुंके, माजी संचालक मंजाबापू थोरात, लोकसेवा महाविकास आडीचे अध्यक्ष शिवाजीराव शिंदे, संचालक दत्तात्रय नाईक, बापूराव त्रिभुवन, तंटामुक्तगाव समितीचे अध्यक्ष बाबासाहेब बनकर, उपसरपंच कान्हा खंडागळे, रावसाहेब मगर, विलास दाभाडे, भाऊ कोकणे, शिवाजी पटारे, बाळासाहेब शेळके, पांडूरंग मगर, प्रशांत नागले, ग्रामपंचायत सदस्य मयुर पटारे, सुनिल बोडखे, जयकर मगर, शिवाजी पवार आदी उपस्थित होते.

टिळकनगर इंडस्ट्रीज लि. (टीआय)

TILAKNAGAR INDUSTRIES LTD

सीआयएन : ङ१५४२०झछ१९३३झङउ१३३३०३

नोंदणीकृत कार्यालय : पी.ओ. टिळकनगर, ता.श्रीरामपूर, जि. अहमदनगर, महाराष्ट्र - ४१३७२०.
कॉर्पोरेट कार्यालय : ३ रा मजला, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र - ४०० ०२०.
ई- मेल : investor@tilind.com **वेबसाइट :** www.tilind.com
दूरध्वनी : + ९१ २२ २२८३१७१६/१८ **फॅक्स :** + ९१ २२ २२०४६९०४.

विशेष सर्वसाधारण सभेची सूचना व परोक्ष ई-मतदानाची माहिती

१. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, टिळकनगर इंडस्ट्रीज लि.च्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा (ईजीएम) कंपन्या कायदा, २०१३ (कायदा) च्या लागू तरतुदी व त्याअंतर्गत संस्थापित नियम तसेच सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ (सेबी, एलओडीआर विनियमन) सहवाचन कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे जारी सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १४/२०२०, १७/२०२० व २०/२०२० अनुक्रमे दिनांक ०८.०४.२०२०, १३.०४.२०२० व ०५.०५.२०२० (एकत्रितरीत्या एमसीए परिपत्रके म्हणून उल्लेखित) तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळाद्वारे जारी परिपत्रक दि. १२.०५.२०२० व दि. १५.०१.२०२१ (सेबी परिपत्रक) यांच्या अनुपालनांतर्गत शनिवार, दि. २७.११.२०२१ रोजी स. १०.३० वाजता ईजीएमच्या सूचनेत विहित केल्यानुसार सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीविना व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ व्हिज्युअल (ओएव्हीएम)च्या माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे.

२. वरील एमसीए परिपत्रके व सेबी परिपत्रक दि. १२.०५.२०२० च्या अनुपालनांतर्गत बुधवार, दि. ०३.११.२०२१ रोजीनुसार ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनी वा रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट्स व डिपॉझिटरीज यांच्याकडे नोंदवलेले आहेत अशा सभासदांना ईजीएमची सूचना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवण्यात आली आहे. एमसीए परिपत्रके व सेबी परिपत्रकानुसार एजीएमच्या सूचनेच्या प्रत्यक्ष प्रती पाठवण्याची आवश्यकता रद्दबातल आहे.

३. ईजीएमची सूचना व स्पष्टिकरण अहवाल कंपनीची वेबसाइट www.tilind.com वर तसेच स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइट्स अर्थात www.bseindia.com व www.nseindia.com वर उपलब्ध आहेत. सदर प्रती सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) ची वेबसाइट www.evotingindia.com वरही उपलब्ध आहे.

४. कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०८ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २०, वेळोवेळी सुधारित, भारतीय कंपनी सचिव संस्थेद्वारे जारी सर्वसाधारण सभांवरील सचिवालयीन निकष (एसएस - २) व सेबी एलओडीआर विनियमनांच्या विनियमन ४४ च्या उप - कलम (१) व (२) यांच्या अनुपालनांतर्गत कंपनी आपल्या सभासदांना एजीएममध्ये विचारविनिमय करावयाच्या विषयांसंदर्भात ईजीएमपूर्वी परोक्ष ई-मतदान तसेच ईजीएमदरम्यान मतदानाची सुविधा उपलब्ध करून देत आहे व याकरिता कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीडीएसएलची सेवा नेमली आहे.

सभासद ईजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून (परोक्ष ई-मतदान) आपली मते देऊ शकतील. परोक्ष ई-मतदानाचा कालावधी बुधवार, दि. २४.११.२०२१ रोजी स. ९.०० वा. (भा. प्र. वे.) सुरू होईल व शुक्रवार, दि. २६.११.२०२१ रोजी सायं. ५.०० वाजता (भा. प्र. वे.) संपेल. सदर कालावधीदरम्यान, **शनिवार, दि. २०.११.२०२१** (''निर्धारित अंतिम तारीख'') रोजीनुसार कागदोपत्री स्वरूपातील किंवा डीमटेरियलाइज्ड् स्वरूपातील भागधारक असलेले सभासद परोक्ष ई-मतदानाद्वारे आपली मते देऊ शकतील.

परोक्ष ई-मतदानाकरिताचे विस्तृत निर्देश ईजीएमच्या सूचनेत दिलेले आहेत. सभासदांनी कृपया खालील बाबींची नोंद घ्यावी :

ए) परोक्ष ई-मतदान कालावधी खालील कालावधीदरम्यान उपलब्ध असेल :

परोक्ष ई-मतदानाचा प्रारंभ	बुधवार, दि. २४.११.२०२१ रोजी स. ९.०० वाजल्यापासून
परोक्ष ई-मतदान समाप्ती	शुक्रवार, दि. २६.११.२०२१ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत.

तत्पश्चात सीडीएसएलद्वारे परोक्ष ई-मतदानाची सुविधा अकार्यरत करण्यात येईल.

बी) सभासदांचा मतदान हक्क हा **शनिवार, दि. २०.११.२०२१** (''निर्धारित अंतिम तारीख'') रोजीनुसार कंपनीच्या प्रदानित समभाग भांडवलातील त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणात असेल. परोक्ष ई-मतदान प्रणालीची सुविधा सभेदरम्यानही उपलब्ध असेल व परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत यापूर्वी न दिलेले सभेस उपस्थित राहिलेले सभासद सभेदरम्यान आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील. निर्धारित अंतिम तारखेनुसार सभासदांचे रजिस्टर/लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नाव नोंद असलेल्या व्यक्तीच केवळ एजीएमपूर्वी परोक्ष ई-मतदान व ईजीएमदरम्यान मतदानाची सुविधा प्राप्त करू शकतील.

सी) एखाद्या सभासदाने सूचनेच्या ई-मेल/पाठवणीपश्चात कंपनीचे शेअर्स संपादित केले असतील व कंपनीचा सभासद बनला असल्यास व निर्धारित अंतिम तारखेस भागधारक असल्यास सदर व्यक्ती helpdesk.evoting@cdslindia.com येथे ई-मेल पाठवून परोक्ष ई-मतदानाकरिता लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल किंवा सीडीएसएलद्वारे दिलेल्या टोल फ्री क्रमांक १८००-२२५५३३ वर संपर्क साधू शकेल. निर्धारित अंतिम तारखेस सभासद नसलेल्या व्यक्तींनी सदर सूचना केवळ माहितीसाठी समजावी.

५. कागदोपत्री स्वरूपातील/डीमॅट स्वरूपातील भागधारक असलेल्या व कंपनी/रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट्स (रजिस्ट्रार)/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपीज) यांच्याकडे ई-मेल पत्ते न नोंदवलेले/अद्ययावत न केलेल्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत/अद्ययावत करण्यासाठी तसेच परोक्ष ई-मतदानाद्वारे वा ईजीएममध्ये ई-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठी युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करण्यासाठी कृपया खालील दस्तावेज /माहिती ई-मेलद्वारे investor@tilind.com येथे वा info@bigshareonline.com येथे पाठवावी.

- कंपनीच्या नोंदींमध्ये नोंदणीकृत नाव.
- ई-मेल आयडी व मोबाइल क्रमांक.
- डीपीआयडी - क्लायन्ट आयडी, क्लायन्ट मास्टर कॉपी वा कन्सॉलिडेटेड अकाऊंट स्टेटमेंट (डीमॅट स्वरूपात धारण शेअर्ससंदर्भात)
- शेअर प्रमाणपत्राची पुढील व मागील बाजूची स्कॅन केलेली प्रत (कागदोपत्री स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससंदर्भात).
- पॅन व आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत.

६. एखाद्या व्यक्तीने सूचनेच्या पाठवणीपश्चात कंपनीचे शेअर्स संपादित केले असतील व कंपनीचा सभासद बनला असल्यास व निर्धारित अंतिम तारखेस भागधारक असल्यास सदर व्यक्ती ईजीएमच्या सूचनेमध्ये विहित केल्यानुसार लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतील.

७. इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मतदान सुविधेशी संबंधित सर्व तक्रारी श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल), ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युच्युरेक्स, मफतलाल मिल कम्पाऊंड्स, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०० ०१३ येथे पाठवाव्यात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ई-मेल करावा किंवा ०२२-२३०५८५४२/४३ येथे संपर्क साधावा.

८. परीनिरीक्षकांच्या अहवालासमवेत घोषित निकाल अध्यक्षांद्वारे वा त्यांच्याद्वारे लिखित स्वरूपात अधिकृत व्यक्तीद्वारे निकालाच्या घोषणेपश्चात त्वरित कंपनीची वेबसाइट www.tilind.com वर तसेच सीडीएसएलच्या वेबसाइटवर प्रदर्शित करण्यात येईल. निकाल स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइट्स अर्थात www.bseindia.com व www.nseindia.com वरही अपलोड करण्यात येईल.

संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने
सही/-
अमित डहाणूकर
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : ०३.११.२०२१
ठिकाण : मुंबई

जिंकले ! जिंकले !! जिंकले !!!

महाराष्ट्र राज्य सह्याद्री मासिक सोडतीच्या दि. १२.१०.२०२१ च्या सोडतीमध्ये २५ लाखाचे पहिले बक्षीस जिंकले. विजेत्याचे हार्दिक अभिनंदन !

आता दिवाळीमध्ये जिंका

* महाराष्ट्र दिवाळी	दि. १२.११.२१	एक करोड
* पंजाब दिवाळी बंपर	दि. ८.११.२१	४ करोड
* डियर २०००	दि. ४.११.२१	५ करोड
* महाराष्ट्र सह्याद्री मासिक सोडत	दि. १.११.२१	२५ लाख
* गोल्डन दिवाळी	दि. ११.११.२१	२ करोड
* राजश्री दिवाळी	दि. १६.११.२१	५१ लाख
* महाराष्ट्र गणेश	दि. १९.११.२१	२२ लाख

आजच संपर्क करा.

लकी लॉटरी

३१३२, जुना कापड बाजार, अहमदनगर.
जी. पी. नंबर १४०४०५६६४५.
(०२४१) २४१११६०
होम टिलिव्हरी दिली जाईल.

आमच्या सर्व ग्राहकांना व हितचिंतकांना ही दीपावली आनंदाची व भरभराटीची जावो !